SAMPLE CONTENT

PRO LinGo

# मराठी (HL)

# व्याकरण व लेखन




सावली म्हात्रे
M.A., D.T.Ed.


## इयत्ता पाचवी
(मराठी माध्यम)


Published by:
LAZY BONE EDUCATION

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे - ०४
यांच्याद्वारे नियोजित पाठ्यपुस्तकावर आधारित.

# मराठी (HL)
# व्याकरण व लेखन
## इयत्ता पाचवी (मराठी माध्यम)

### टळक वैशिष्ट्ये

- ☞ पाठ्यपुस्तकातील व्याकरण व लेखनावर आधारित प्रश्न समाविष्ट
- ☞ व्याकरण विभागातील सर्व घटकांच्या संकल्पनांचे सुलभ स्पष्टीकरण
- ☞ व्याकरण विभागात अंतर्भूत घटकांचा परिपूर्ण सराव
- ☞ उत्तरे लिहिण्याकरिता पर्याप्त जागा उपलब्ध
- ☞ उत्तरांचा पडताळा घेण्याकरिता उत्तरसूची समाविष्ट
- ☞ लेखन विभागातील सर्व घटकांच्या संकल्पनांचे सविस्तर स्पष्टीकरण अंतर्भूत
- ☞ लेखन विभागातील प्रत्येक घटकावर आधारित सोडवलेले भरपूर प्रश्न
- ☞ लेखन विभागातील घटकांमध्ये आवश्यक तेथे सरावासाठी मुबलक प्रश्न समाविष्ट

Sample Content

Printed at: **Print to Print,** Mumbai

© *Lazy Bone Education*
*No part of this book may be reproduced or transmitted in any form or by any means, C.D. ROM/Audio Video Cassettes or electronic, mechanical including photocopying; recording or by any information storage and retrieval system without permission in writing from the Publisher.*

Balbharati Registration No.: 2022MH0007 **TEID: 3420** P.O. No. 11114

# प्रस्तावना

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासातील प्रत्येक टप्पा महत्त्वाचा असतो. इयत्ता पाचवीचे वर्षही विद्यार्थ्यांच्या विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जडणघडणीत भाषा महत्त्वाची भूमिका बजावते. त्यामुळे, मराठी विषयात उत्तम गुण मिळवण्यासाठी, व्याकरण घटकांचा सखोल अभ्यास करण्याची सवय लागावी यासाठी, तसेच भाषेवर प्रभुत्व मिळवण्यासाठी **लेझी बोन एज्युकेशनचे मराठी (HL) व्याकरण व लेखन इयत्ता पाचवी** हे पुस्तक विद्यार्थ्यांच्या हाती सोपवताना आम्हांला आनंद होत आहे.

व्याकरणाच्या पायावर भाषेची इमारत उभी राहते. हा पाया मजबूत असेल, तर भाषेवर प्रभुत्व मिळवणे सोपे जाते, तसेच व्याकरणात अधिकाधिक गुण मिळवणे सहज शक्य होते. यासाठी व्याकरण घटकांच्या मूलभूत संकल्पना समजून घेणे आवश्यक असते. विद्यार्थ्यांची ही गरज ओळखून आम्ही या संकल्पनांचे सहज सोप्या भाषेत स्पष्टीकरण देण्याबरोबरच भरपूर सराव प्रश्न समाविष्ट केले आहेत. शब्दसंपत्ती व व्याकरणावरील विद्यार्थ्यांची पकड मजबूत होईल याकडे विशेष लक्ष देण्यात आले आहे.

लेखन विभागात नवनिर्मितीचा आनंद दडलेला असतो. विद्यार्थ्यांना स्वभाषेत लिखाणास प्रवृत्त करणे हा या विभागाच्या अभ्यासामागील मूळ उद्देश आहे. लेखन विभागामध्ये समाविष्ट घटकांचे लेखन कसे करावे? कोणत्या गोष्टी लक्षात ठेवाव्यात? यासंदर्भातील सविस्तर विवेचन प्रत्येक घटकाच्या प्रारंभी देण्यात आले आहे. यासंदर्भात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन मिळावे यासाठी अनेक नमुना प्रश्नांनी यातील सारे घटक समृद्ध करण्यात आले आहेत. यामुळे, विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला व सृजनशीलतेला वाव मिळेल याची आम्हांला खात्री आहे.

व्याकरणावर आधारित भरपूर प्रश्न, लेखन विभागातील २० निबंध, ५ पत्र, ९ कथा, ५ संवाद, ५ मुलाखतीकरिता प्रश्नावली, ७ जाहिरातींचे आकलन, सूचनाफलक, घोषवाक्ये, अनुलेखन एवढा विपुल अभ्यास झाल्यानंतर मुलांना जास्तीत जास्त गुण मिळवणे शक्य होईल.

सरावानेच सिद्धी प्राप्त होते असे म्हणतात. हा सराव योग्य दिशेने असावा याकरिता हे पुस्तक विद्यार्थ्यांना नक्कीच उपयुक्त ठरेल.

**धन्यवाद!**

**ज्ञानार्थींना मन:पूर्वक शुभेच्छा!**

**प्रकाशक**

**आवृत्ती :** प्रथम

हे पुस्तक उत्कृष्ट व्हावे, यासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न केले आहेत. तरी पुस्तक अधिकाधिक उत्कृष्ट व्हावे, यासाठी आपल्या सूचना स्वागतार्ह आहेत. याकरिता आपला अभिप्राय support@lazybone.in या इ-मेल पत्त्यावर पाठवावा, ही नम्र विनंती.

Sample Content

**Disclaimer**

This reference book is transformative work based on 'मराठी बालभारती, सातवे पुनर्मुद्रण : २०२२' published by the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. We the publishers are making this reference book which constitutes as fair use of textual contents which are transformed by adding and elaborating, with a view to simplify the same to enable the students to understand, memorize and reproduce the same in examinations.

This work is purely inspired upon the course work as prescribed by the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. Every care has been taken in the publication of this reference book by the Authors while creating the contents. The Authors and the Publishers shall not be responsible for any loss or damages caused to any person on account of errors or omissions which might have crept in or disagreement of any third party on the point of view expressed in the reference book.

© reserved with the Publisher for all the contents created by our Authors.

No copyright is claimed in the textual contents which are presented as part of fair dealing with a view to provide best supplementary study material for the benefit of students.

# अनुक्रमणिका


| क्र. | पाठाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| | **व्याकरण विभाग** | |
| १. | शब्दांच्या जाती | |
| • | नाम | १ |
| • | सर्वनाम | ४ |
| • | विशेषण | ८ |
| • | क्रियापद | ११ |
| २. | सामान्यरूप | १४ |
| ३. | उपसर्ग आणि प्रत्यय | १६ |
| ४. | समानार्थी शब्द | २१ |
| ५. | विरुद्धार्थी शब्द | २५ |
| ६. | लिंग | २९ |
| ७. | वचन | ३३ |
| ८. | वाक्प्रचार | ३७ |
| ९. | म्हणी | ४९ |
| १०. | लेखननियम | ५३ |
| ११. | विरामचिन्हे | ५८ |
| १२. | काळ | ६२ |
| १३. | शब्दसंपत्ती | ६५ |
| • | सराव प्रश्नपत्रिका - १ | ७७ |
| • | सराव प्रश्नपत्रिका - २ | ७९ |
| • | उत्तरे | ८१ |
| | **लेखन विभाग** | |
| १. | निबंधलेखन | ९५ |
| २. | पत्रलेखन | १०३ |
| ३. | संवादलेखन | १०७ |
| ४. | जाहिरात (प्रश्नोत्तरे) | १०९ |
| ५. | कथालेखन | ११५ |
| ६. | सूचनाफलक | १२० |
| ७. | घोषवाक्ये | १२२ |
| ८. | अनुलेखन | १२३ |
| ९. | प्रश्नावली | १२४ |


**[टीप : पाठ्यपुस्तकातील व्याकरण व लेखनावर आधारित प्रश्न * या चिन्हाने दर्शवले आहेत.]**

Sample Content

Sample Content

# व्याकरण विभाग

## १ शब्दांच्या जाती

आपण आपल्या मनातील भावना वाक्यरूपाने प्रकट करतो. वाक्य हे शब्दांचे बनलेले असते. आपण बोलताना अथवा लिहिताना वेगवेगळ्या शब्दांचा उपयोग करतो. या शब्दांच्या कार्यांनुसार त्यांना वेगवेगळी नावे देण्यात आली आहेत. त्यांना शब्दांच्या जाती म्हणतात. शब्दांच्या एकूण आठ जाती आहेत. वाक्यात उपयोग करताना ज्या शब्दांच्या रूपात बदल होतो त्यांना **विकारी किंवा सव्यय शब्द** म्हणतात. ज्या शब्दांमध्ये मुळीच बदल होत नाही त्यांना **अविकारी किंवा अव्यय शब्द** म्हणतात.

**शब्दांच्या जाती**


| **विकारी शब्द (सव्यय)** | | **अविकारी शब्द (अव्यय)** | |
|---|---|---|---|
| १. नाम | २. सर्वनाम | ५. क्रियाविशेषण अव्यय | ६. शब्दयोगी अव्यय |
| ३. विशेषण | ४. क्रियापद | ७. उभयान्वयी अव्यय | ८. केवलप्रयोगी अव्यय |

[**टीप :** या वर्षीच्या अभ्यासक्रमात आपण विकारी शब्दांचा अभ्यास करणार आहोत.]


### नाम

**कोणतीही व्यक्ती, वस्तू, जागा, पशुपक्षी, भावभावना अथवा गुणधर्म यांना दिलेले नाव म्हणजे 'नाम' होय.**


**उदा.**




कुत्रा




पोपट



गुलाब



चेंडू



आंबा

**नामांचे प्रकार**

- सामान्यनाम
- विशेषनाम
- भाववाचकनाम

**सामान्यनाम :** एकाच प्रकारच्या किंवा समान गुणधर्म असलेल्या वस्तूंचा बोध ज्या नामाद्वारे होतो त्याला **सामान्यनाम** असे म्हणतात.

**उदा.** प्राणी, माणूस, नदी, पर्वत, देश इत्यादी.

**लक्षात ठेवा**

मराठीमध्ये 'समूहवाचक नाम' किंवा 'पदार्थवाचक नाम' वेगळे न मानता त्यांना सामान्यनाम म्हटले जाते.


**विशेषनाम :** सामान्यनामातील विशिष्ट व्यक्ती, प्राणी, वस्तू यांचा बोध ज्या नामाने होतो त्या नामाला **विशेषनाम** असे म्हणतात.

**उदा.** राम, कृष्ण, भारत, गंगा, हिमालय, मुंबई, रायगड, इत्यादी.

**भाववाचकनाम :** ज्या नामाद्वारे प्रत्यक्ष वस्तूचा बोध न होता त्या वस्तूचे गुणधर्म अथवा भाव, स्वभाववैशिष्ट्ये यांचा बोध होतो त्यांना **भाववाचकनाम** असे म्हणतात. हे गुणधर्म, भावना, स्वभाववैशिष्ट्ये असल्याने त्यांचे अस्तित्व नजरेला दिसत नाही.

**उदा.** शूरता, आनंद, गारवा, गोडवा, सौंदर्य इत्यादी.


Sample Content



सामान्यनाम → प्राणी
विशेषनाम → हत्ती
भाववाचकनाम → बुद्धिमत्ता



सामान्यनाम → माणूस
विशेषनाम → शिवाजी महाराज
भाववाचकनाम → शौर्य



सामान्यनाम → फूल
विशेषनाम → कमळ
भाववाचकनाम → सौंदर्य

## सराव प्रश्न

### १. खालील वाक्यांतील नामे ओळखा व लिहा.

i. शब्बीर खाली बसला. – ..............................

ii. पाऊस कमी झाला. – ..............................

iii. तो शाळेत येऊन सुरवाडेगुरुजींना भेटला. – ..............................

iv. पाकिटात पैसे नव्हते. – ..............................

v. मुले बागेतील फुलेफळे जपू लागली. – ..............................

vi. कविता राऊतमुळे हरसूलपाड्याला आनंद झाला. – ..............................

### *२. वरीलप्रमाणे नामे वापरून पाच वाक्ये लिहा.

उत्तर : ..............................

..............................

..............................

..............................

..............................

### *३. व्यक्ती, प्राणी, पक्षी, कीटक, वस्तू, पदार्थ, फळे, फुले, गावे, नद्या, गुण या प्रत्येक प्रकाराची दहा नावे गटात चर्चा करून लिहा.

व्यक्ती : ..............................

प्राणी : ..............................

पक्षी : ..............................

कीटक : ..............................



Sample Content

वस्तू : ------------------------------------------------
पदार्थ : ------------------------------------------------
फळे : ------------------------------------------------
फुले : ------------------------------------------------
गावे : ------------------------------------------------
नद्या : ------------------------------------------------
गुण : ------------------------------------------------

## *४. खालील वाक्यांतील नामे ओळखा व सांगा.

i. बंडूची इजार चार बोटे लांब झाली. – ------------------------
ii. आईने इजार एका कोनाड्यात फेकली. – ------------------------
iii. माणसांप्रमाणे मुंग्या नक्कीच बोलत नाहीत. – ------------------------
iv. आज कविता भारतातील अव्वल धावपटू आहे. – ------------------------


## *५. खालील वाक्यांतील रिकाम्या जागी योग्य नामे घाला.

i. ------------ माधवला म्हणाली.
ii. आंब्याच्या झाडावर ------------ लटकत होत्या.
iii. घसरगुंडी खेळायला आम्ही ------------ गेलो.
iv. ------------ विषय मला खूप आवडतो.
v. राष्ट्रपतींचे भाषण ऐकून ------------ मंत्रमुग्ध झाला.
vi महागाई वाढल्याने ------------ महागल्या.

## ६. खालील वाक्यांतील नामे अधोरेखित करा.

i. कविता हळवी आहे.
ii. वाघाचा पंजा चौकोनी असतो.
iii. तो खेळ आम्ही मधल्या सुट्टीत खेळत असतो.
iv. नुसतं कोरडं आभाळ पसरलं होतं.
v. मुले प्रार्थना म्हणत होती.
vi आपल्या लोकांची बोरगावला पालं हायती.
vii. महाराज मी वादक नाही.
viii. अख्ख्या सातपुड्यात ढोलांवर थाप पडू लागते.

## ७. खालील चित्रातील नामे ओळखून लिहा.



उत्तर : ------------------------------------------------
------------------------------------------------
------------------------------------------------
------------------------------------------------

Sample Content

**८. खालील पर्यायांपैकी विशेषनामाचा पर्याय ओळखा.**

i. (अ) विजय (ब) लाडू (क) अमेय (ड) वरीलपैकी सर्व

ii. (अ) गोडवा (ब) शहर (क) राजस्थान (ड) वरीलपैकी सर्व

## सर्वनाम

**वाक्यांमध्ये एकच नाम वारंवार येत असेल, तर त्याऐवजी जो शब्द वापरला जातो त्याला 'सर्वनाम' असे म्हणतात.**

**उदा.** सुजय हुशार मुलगा आहे. सुजय इयत्ता पाचवीत शिकतो. सुजय सकाळी लवकर उठतो. सुजय सकाळी लवकर शाळेत जातो. सचिन हा सुजयचा मित्र आहे. सुजय व सचिन मैदानावर खेळतात. सुजयला वडापाव खूप आवडतो.

या उताऱ्यात सुजय हे नाम वारंवार आले आहे. ते वाचताना खटकते, त्यामुळे सुजय हे नाम पहिल्या वाक्यात आल्यानंतर पुढील सर्व वाक्यांमध्ये त्या ऐवजी सर्वनामे वापरून आपण हा उतारा पुढीलप्रमाणे लिहू शकतो :

सुजय हुशार मुलगा आहे. तो इयत्ता पाचवीत शिकतो. तो सकाळी लवकर उठतो. तो सकाळी लवकर शाळेत जातो. सचिन हा त्याचा मित्र आहे. तो व सचिन मैदानावर खेळतात. त्याला वडापाव खूप आवडतो.

मूळ सर्वनामे नऊ आहेत. ती पुढीलप्रमाणे-

**मी**, **तू**, **तो**(ती,ते,त्या), **हा** (ही,हे,ह्या), **जो**(जी,जे,ज्या) **कोण**, **आपण**, **काय**, **स्वत** :

### सर्वनामांचे प्रकार

- पुरुषवाचक सर्वनाम
- दर्शक सर्वनाम
- संबंधी सर्वनाम
- प्रश्नार्थक सर्वनाम
- सामान्य सर्वनाम
- आत्मवाचक सर्वनाम

(**टीप :** यावर्षीच्या अभ्यासक्रमात आपण पुरुषवाचक सर्वनाम, दर्शक सर्वनाम व संबंधी सर्वनाम यांचा अभ्यास करणार आहोत.)


१. **पुरुषवाचक सर्वनाम :** व्याकरणामध्ये पुरुष म्हणजे बोलणारा, ऐकणारा किंवा ज्याच्याविषयी बोलले जाते, ती व्यक्ती होय. यानुसार बोलणारा स्वत :विषयी बोलताना, ज्याच्याशी बोलतो त्याच्याबद्दल अथवा ज्याच्याविषयी बोलतो त्याच्यासाठी जी सर्वनामे वापरतो त्यांना **पुरुषवाचक सर्वनामे** म्हणतात.


पुढील तक्त्यावरून पुरुषवाचक सर्वनामे लक्षात घ्या.

**उदा.**

| सर्वनाम | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथम पुरुषवाचक | मी | आम्ही |
| द्वितीय पुरुषवाचक | तू | तुम्ही |
| तृतीय पुरुषवाचक | तो(पुल्लिंग)<br>ती (स्त्रीलिंग)<br>ते(नपुंसकलिंग) | ते<br>त्या<br>ती |

सर्वनाम हे लिंग किंवा वचन यांप्रमाणे बदलते.


मुलगा - तो, हा


मुलगी - ती, ही


मूल - ते, हे


मुले – ती, ही

Sample Content

२ **दर्शक सर्वनाम :** ज्या सर्वनामाने दूरची किंवा जवळची वस्तू दाखवली जाते, त्यांना 'दर्शक सर्वनाम' असे म्हणतात.

**उदा.** ते सुंदर फूल गुलाबाचे आहे.
त्याने शर्यत जिंकली.
हे माझे घर आहे.

(**लक्षात ठेवा :** तो, ती, ते, हा, ही, हे या सर्वनामांनंतर विशेषण व त्यानंतर नाम असेल, तर ही सर्वनामे 'दर्शक सर्वनाम' असतात. तो ,ती,ते, हा, ही, हे यांपैकी कोणतेही सर्वनाम वाक्यातील कर्ता असेल, तर ते दर्शक 'सर्वनाम' असते.)

**उदा.** 'ती हुशार मुलगी आहे' व 'ती हुशार आहे' या दोन वाक्यांतील पहिल्या वाक्यात 'ती' हे दर्शक सर्वनाम आहे, तर दुसऱ्या वाक्यातील 'ती' पुरुषवाचक सर्वनाम आहे. 'ती हुशार मुलगी' आहे असे आपण दाखवू शकतो. गौरी माझी मैत्रीण आहे. ती हुशार आहे. असे आपण म्हणतो तेव्हा 'ती' हे तृतीय पुरुषवाचक सर्वनाम असते.

३. **संबंधी सर्वनाम :** वाक्यात पुढे येणाऱ्या दर्शक सर्वनामाशी संबंध दाखवणाऱ्या सर्वनामांना 'संबंधी सर्वनाम' असे म्हणतात.

**उदा.** जे चकाकते ते सोने नसते.

या वाक्यातील 'ते' हे दर्शक सर्वनाम असून त्याच्याशी संबंध दर्शवणारे 'जे' हे संबंधी सर्वनाम आहे.

## सराव प्रश्न

### *१. खालील परिच्छेदात अधोरेखित केलेली सर्वनामे कोणासाठी वापरली आहेत, ते त्या शब्दांसमोर लिहा.

सुभाष शाळेत आला. समोरच त्याला त्याचा मित्र समीर दिसला. सुभाषला खूप आनंद झाला. तो म्हणाला, "मित्रा,काय रे, कसा आहेस ? बरं वाटतंय ना तुला ? तू नव्हतास तर मला करमत नव्हतं...." सुभाष बोलत होता. बोलताना तो अगदी रडवेला झाला होता. समीरने त्याच्या खांद्यावर हात ठेवला व त्याने सांगायला सुरुवात केली.

**उदा.** त्याला - सुभाषसाठी

i. त्याचा – ------------------------ ii. तो – ------------------------
iii. तुला – ------------------------ iv. तू – ------------------------
v. मला – ------------------------ vi. तो – ------------------------
vii. त्याच्या – ------------------------ viii. त्याने – ------------------------

### *२. खाली काही वाक्ये दिली आहेत. त्यांतील नामे ओळखून त्यांसाठी योग्य ती सर्वनामे वापरा.

i. हसीना खूप हुशार आहे. ------------------------ रोज शाळेत जाते.
ii. पक्षी उडत-उडत लांब गेले. ------------------------ दिसेनासे झाले.
iii. बाई मुलांना खाऊ वाटत होत्या. ------------------------ मुलांशी गप्पा मारत होत्या.
iv. भाऊ घरात गेला. ------------------------ काही सुचेना.

### *३. खालील वाक्यांतील सर्वनामे अधोरेखित करा.

i. ते बाजारात गेले. ii. तुला त्यांनी हाका मारल्या.
iii. आम्ही जेवत होतो. iv. त्याचा आवाज गोड आहे.
v. मी स्वत: झाडून घेतले. vi. आपण प्रकल्प पूर्ण करूया.

Sample Content

## *४. खालील संवाद वाचा. सर्वनामांना अधोरेखित करा.

i. नीता : आज आपण झोका खेळूया.
ii. मंदार : दादा, तू पण चल ना!
iii. दादा : मी नाही येणार. मुग्धाला ने.
iv. मंदार : ती आणि आत्या बाजारात गेल्या आहेत.
v. दादा : त्या आल्या, की तुम्ही खेळा.
vi. नीता : आम्ही नाही खेळणार तू आल्याशिवाय!

## *५. खालील वाक्ये वाचा. त्याखालील वाक्यांत 'पिशवी' ऐवजी योग्य सर्वनामे वापरून वाक्ये लिहा.

**पिशवी खूप सुंदर होती.**

i. पिशवीचा रंग गुलाबी होता. – ------------------- रंग गुलाबी होता.

ii. पिशवीत खूप वस्तू ठेवता येत होत्या. – ------------------- खूप वस्तू ठेवता येत होत्या.

iii. पिशवीला काचा, मणी लावलेले होते. – ------------------- काचा, मणी लावलेले होते.

iv. पिशवी माझ्या मैत्रिणींना खूप आवडली. – ------------------- माझ्या मैत्रिणींना खूप आवडली.

## *६. खालील वाक्यांतील गाळलेल्या जागी कंसातील योग्य सर्वनामे लिहा.

i. ------------------- बाजारातून भाजी आणूया. (तुम्ही, आपण, आम्ही)

ii. आईने जेवायला ------------------- केले आहे. (कोणी, कोण, काय)

iii. कर्ण दानशूर होता. ------------------- दररोज दान द्यायचा. (तो, ती, त्या)

iv. ताईने ------------------- मैत्रिणींसाठी स्वयंपाक केला. (तिच्या, त्याच्या, त्यांच्या)

v. आज ------------------- खूप मजा केली. (आपण, स्वतः, आम्ही)

vi. रमेशने ------------------- मित्रांना वाढदिवसाला बोलवले. (त्याच्या, तिच्या, त्यांच्या)

## *७. खालील संवाद वाचा. अधोरेखित केलेल्या शब्दांकडे विशेष लक्ष द्या.

**कोणते सर्वनाम कोणत्या नामासाठी आले आहे ते ओळखा व लिहा.**

**बंडू** : सुट्टीत मी मामाकडे गेलो होतो. – **जसे : मी - बंडू स्वतःसाठी वापरतो.**

**लता** : आम्ही नाही गेलो कुठेही! – -------------------

**बंडू** : मग तू सुट्टीत काय केलंस? – -------------------

**लता** : माझ्याकडे खूप पुस्तकं आहेत. – -------------------

**मिनू** : तिला वाचायला आवडतं. – -------------------

**लता** : तुला नाही का आवडत? – -------------------

**मिनू** : मला पण आवडतं ना! – -------------------

**बंडू** : गुरुजींनी आपल्याला वाचनाचं महत्त्व सांगितलंय. – -------------------

**लता** : ते पटलंय आम्हांला. – -------------------

Sample Content


**मिनू** : <u>आपण</u> सारे वाचूया. – ------------------------------------------------

**लता** : चांगले वाचक बनूया. – ------------------------------------------------

## ८. खालील वाक्यांतील सर्वनामे अधोरेखित करा.

i. मला खूप अभ्यास पडलाय.
ii. तिचे बालपण निसर्गाच्या सान्निध्यात गेले.
iii. आपण एकमेकांशी संवाद साधतो.
iv. फक्त त्याचा तळवा व चार बोटांचा ठसा मातीत उमटतो.
v. तुम्ही आम्हांला पहिल्यापासून आवडायचात.
vi. तिच्या जीवात जीव नव्हता.
vii. मोठ्या कष्टाने तिला खड्ड्यातून बाहेर काढले.
viii. त्याला स्वत:ची चूक कळून आली.
ix. तुम्ही कोणी रेल्वेनं प्रवास केला आहे का?
x. आम्ही मुली तिच्या हाताखाली काम करायचो.
xi. माझ्या हातावर सव्वा रुपया ठेवला.
xii. जो कुणी गाण्यात बोलणार नाही त्याला शिक्षा करा.


## ९. खालील चित्रांसाठी योग्य ते सर्वनाम लिहा. (तो/हा/ती/ही/ते/हे)





------ घर



------ पुस्तक



------ पुस्तके




------ झाड

## १०. योग्य पर्याय निवडा.

i. ------------------ घरी जाऊया का?

(अ) तुम्ही (ब) मी (क) आपण (ड) तू


ii. घरी पोहोचताच मला ------------------ फोन आला.


(अ) ती (ब) त्याचा (क) त्याला (ड) तुम्ही

Sample Content


## विशेषण


**नामाविषयी अधिक माहिती सांगणारा शब्द म्हणजे 'विशेषण' होय. विशेषण ज्या नामाबद्दल विशेष माहिती देते त्या नामाला 'विशेष्य' असे म्हणतात.**



**उंच** मुलगा


**ठेंगणा** मुलगा


**लहान** उंदीर


**मोठा** हत्ती


**एक** चॉकलेट


**अनेक** झाडे

**उदा.** काळे ढग आकाशात दिसू लागले. लहानशा झोपडीतून दोन मुले बाहेर आली. हिरव्यागार गवतावर रंगीबेरंगी फुलपाखरे उडत होती. मोठ्या मुलाने फुलपाखरू पकडण्यासाठी धाव घेतली. त्याची लहान बहीण त्याच्या मागे धाऊ लागली.

वरील उताऱ्यातील अधोरेखित शब्द त्याच्या पुढे येणाऱ्या नामाबद्दल विशेष माहिती देतात. त्यांचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे करता येईल :

| विशेष्य | विशेषण |
|---|---|
| ढग | काळे |
| झोपडी | लहानशी |
| मुले | दोन |
| गवत | हिरवेगार |

| विशेष्य | विशेषण |
|---|---|
| फुलपाखरे | रंगीबेरंगी |
| मुलगा | मोठा |
| बहीण | लहान |

**विशेषणांचे प्रकार**

- गुणवाचक विशेषण
- संख्यावाचक विशेषण
- सार्वनामिक विशेषण

(या वर्षीच्या अभ्यासक्रमात आपण गुणवाचक व संख्यावाचक या विशेषणांचा अभ्यास करणार आहोत.)

१. **गुणवाचक विशेषण :** ज्या विशेषणामुळे आपल्याला नामाचा गुण समजतो त्याला 'गुणवाचक विशेषण' म्हणतात.

**उदा.** रायदेव **चांगला** राजा होता.
रायगड **उंच** किल्ला आहे.
अक्षय **उत्कृष्ट** गायक आहे.

२. **संख्यावाचक विशेषण :** ज्या विशेषणामुळे आपल्याला नामाची संख्या किंवा प्रमाण समजते त्याला 'संख्यावाचक विशेषण' म्हणतात.

**उदा.** मैदानावर **पाच** कुत्रे बसले होते.
महेश **दोन** किलो तांदूळ घेऊन आला.
सामन्याला **असंख्य** प्रेक्षक उपस्थित होते.

Sample Content

## सराव प्रश्न

***१ पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र. ३७ वरील चित्राचे निरीक्षण करा. विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे पुढील चौकटीत लिहा.**

i. कलिंगडाचा आकार कसा ? ------------------------------

ii. कलिंगडाचा रंग कोणता ? ------------------------------

iii. कलिंगडाची चव कशी ? ------------------------------

***२. पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र. ४० वरील 'पऱ्या काय बोलल्या' ? हा भाग वाचा. पाचवी, सहावी आणि सातवी परी नेमकं काय म्हणाली असेल ? त्यांना त्यांच्या दुलईबद्दल काय विशेष माहिती सांगायची असेल ? कंसातील शब्दांमधून योग्य शब्द वापरून त्यांची वाक्ये पूर्ण करा.**

**(गुबगुबीत, खरखरीत, मखमली, हलक्याफुलक्या, रंगीबेरंगी, सुगंधी, जुनाट, झिरमिरीत)**

**पहिली परी** : सकाळ झाली. मी दुलईतून बाहेर पडले.

**दुसरी परी** : सकाळ झाली. मी उबदार दुलईतून बाहेर पडले.

**तिसरी परी** : सकाळ झाली. मी मऊमऊ, उबदार दुलईतून बाहेर पडले.

**पाचवी परी** : सकाळ झाली. मी ---------, स्वच्छ, मऊमऊ, उबदार दुलईतून बाहेर पडले.

**सहावी परी** : सकाळ झाली. मी ---------, ---------, स्वच्छ, मऊमऊ, उबदार दुलईतून बाहेर पडले.


**सातवी परी** : सकाळ झाली. मी ---------, ---------, ---------, स्वच्छ, मऊमऊ, उबदार दुलईतून बाहेर पडले.

***३. खालील मुलांना काय-काय आवडतं ते दिलंय. त्या वस्तू/ पदार्थांविषयी विशेष माहिती देण्यासाठी कोणकोणते शब्द वापरता येतील, याची चर्चा करून तक्ता पूर्ण करा.**

| नाव | आवडणारी गोष्ट/पदार्थ | विशेष माहिती देणारे शब्द |
|---|---|---|
| अमिता | पेरू | गोड,हिरवा, पिकलेला, ------------------------------ |
| रजनी | पाऊस | बुरबुर, ------------------------------ |
| जिया | आइसक्रीम | थंडगार, ------------------------------ |
| राजसी | शेंगदाणे | ------------------------------ |
| दिनेश | नदीकाठ | ------------------------------ |

Sample Content

## *४. खालील चित्रांना दोन-दोन विशेषणे लावा.

i.



--------------------

--------------------

ii.



--------------------

--------------------

iii.



--------------------

--------------------

iv.


--------------------

--------------------

v.


--------------------

--------------------

## *५. खालील वाक्यांतील रिकाम्या जागी कंसातील योग्य विशेषणे लिहा. (टवटवीत, निळेशार, नवा, पन्नासावा, उंच)

i. हिमालय ---------------- पर्वत आहे.


ii. बागेत ---------------- फुले आहेत.

iii. काल बाबांचा ---------------- वाढदिवस होता.

iv. समुद्राचे पाणी ---------------- दिसत होते.


v. ताईने बाळाला ---------------- सदरा घातला.

## *६. खालील चित्रांना विशेषणे लावा.

i.


सशक्त

------------ ------------ ------------ ------------ ------------

ii.


------------ ------------ ------------ ------------ ------------ ------------

## ७. खालील विशेषणांचा वाक्यात उपयोग करा.

i. चांगला - ----------------------------------------

ii. निळे - ----------------------------------------

iii. कच्चा - ----------------------------------------

Sample Content

## ८. खालील वाक्यांतील विशेषणे ओळखून लिहा.

i. बंडूने छोटी इजार घातली होती. – ----------

ii. कविता अव्वल धावपटू आहे. – ----------

iii. सगळ्या मुंग्या सारख्याच दिसतात. – ----------

iv. पोरं चार शेंगा खातील. – ----------

v. एक बाई खाली दबून गेली आहे. – ----------

vi. शेठ गरीब माणसांमध्ये रमले. – ----------

## ९. योग्य पर्याय निवडा.

i. खालीलपैकी संख्याविशेषण ओळखा.

(अ) असामान्य (ब) अनेक (क) गोड (ड) सुंदर

ii. खालीलपैकी गुणवाचक विशेषण नसलेला शब्द ओळखा.

(अ) विचारी (ब) कुजका (क) लबाड (ड) दुष्ट

## *१०. तुमच्या आवडीच्या कोणत्याही पाच वस्तूंची नावे घेऊन त्यांच्यासाठी विशेषणे लिहा.

**उत्तर :** ----------

----------

----------

### क्रियापद

खालील शब्दसमूह वाचा.

१. मुले शाळेत २. आमचा क्रिकेटचा संघ

या शब्दसमूहातून आपल्याला कोणती क्रिया घडली हे समजत नाही. त्यामुळे, ते अपूर्ण वाटतात. वाक्य म्हणजे शब्दांचा अर्थपूर्ण समूह होय.

यावरून आपल्या लक्षात येते, की वाक्याचा अर्थ पूर्ण करण्यासाठी एका विशेष शब्दाची आवश्यकता असते.

**उदा.** मुले शाळेत **जातात.** आमचा क्रिकेटचा संघ **जिंकला.**

'जातात' व 'जिंकला'या शब्दांमुळे या दोन्ही शब्दसमूहांना अर्थ प्राप्त होतो. ही दोन्ही 'क्रियापदे' आहेत.

**वाक्यातील क्रिया दाखवणारा व त्या वाक्याचा अर्थ पूर्ण करणारा शब्द म्हणजे 'क्रियापद' होय.**


**उदा.**



जय **धावतो.**



अजय **खेळतो.**



राज **पोहतो.**



यश **वाचतो.**



कुत्रा **भुंकतो.**

वरील चित्रे पाहून आपल्याला क्रिया कळतात तसेच ठळक अक्षरांतील शब्द वाक्यांचा अर्थ पूर्ण करतात. म्हणजे हे शब्द क्रियापद आहेत.

Sample Content

## सराव प्रश्न

***१ खालील वाक्यांतील क्रियापदे अधोरेखित करा.**

i. समीरने पुरणपोळी खाल्ली.
ii. शाळा सुरू झाली.
iii. मुलींनी टाळ्या वाजवल्या.
iv. शिक्षकांनी मुलांना प्रश्न विचारले.
v. रमेशने अभ्यास केला.
vi. वैष्णवी सुंदर गाते.

***२. कंसातील क्रियापदे योजून पुढील वाक्ये पूर्ण करा. (लागला, गेले, सोडले, करतात.)**

i. तिचे बालपण निसर्गाच्या सान्निध्यात ------------------ .
ii. एखादे संकट आल्यावर मुंग्या एकमेकींना सावध ------------------ .
iii. त्याने घर ------------------ व तो रामटेकच्या जंगलात भटकू ------------------ .

***३. कंसात काही क्रियापदे दिली आहेत. त्यांची योग्य रूपे तयार करून खालील वाक्यांतील रिकाम्या जागी लिहा.**

**उदा.,** राधाने टाळ्या ------------------ (वाजवणे)
राधाने टाळ्या <u>वाजवल्या.</u>

i. शिक्षकांनी मुलींचे अभिनंदन ------------------. (करणे)
ii. चंदूने झाडांना पाणी ------------------. (घालणे)
iii. आईने नीताला प्रश्न ------------------. (विचारणे)
iv. मंदा गाणी छान ------------------. (म्हणणे)

***४. कंसातील सूचनेनुसार वाक्ये बदलून पुन्हा लिहा.**

i. आकाशात ढग येताच <u>मोर</u> नाचू लागला. – ------------------------------------
('मोर' ऐवजी 'मुले' हा शब्द घ्या.)
ii. साप दिसताच <u>तो</u> घाबरला. – ------------------------------------
('तो' ऐवजी 'त्या' हा शब्द घ्या.)
iii. <u>अभयने</u> दप्तर जागेवर ठेवले. – ------------------------------------
('अभय' ऐवजी 'शारदा' हा शब्द घ्या.)

**५. खालील वाक्यांतील क्रियापदे अधोरेखित करा.**

i. मी इजार चार बोटं कापली.
ii. ती राहणार कुठे ?
iii. आपण एकमेकांशी संवाद साधतो.
iv. अशा पाऊलवाटा तपासाव्या.
v. मी तर आनंदानं उडालोच.
vi. ती शेंगांच्या वावरात शिरली.

Sample Content

## ६. दिलेल्या क्रियापदांचा वाक्यात उपयोग करा. (जाणे, मांडणे, ठेवणे, असणे, करणे, लागणे.)

i. जाणे – ------------------------------------------------

ii. मांडणे – ------------------------------------------------

iii. ठेवणे – ------------------------------------------------

iv. असणे – ------------------------------------------------

v. करणे – ------------------------------------------------

vi. लागणे – ------------------------------------------------

## ७. कंसात दिलेल्या क्रियापदाचे योग्य रूप लिहून वाक्य पूर्ण करा.

i. यश रोज खेळायला ------------------. (जाणे)

ii. धावणारा घोडा अचानक ------------------. (थांबणे)

iii. एक पक्षी आकाशात ------------------. (उडणे)

iv. गाय चारा ------------------. (खाणे)

v. मुले अभ्यास ------------------. (करणे)

## ८. रिकाम्या जागी क्रियापदाचा योग्य पर्याय निवडा.

i. आम्ही शर्यत ------------------.

अ. वाढली   ब. उघडली   क. जिंकलो   ड. मागवली

ii. काम संपवून कामगार ------------------.

अ. निघाले   ब. आले   क. बसले   ड. वरीलपैकी सर्व

Sample Content

Page no. **14** to **76** are purposely left blank.

To see complete chapter buy **Target Notes** or **Target E-Notes**

Sample Content

# सराव प्रश्नपत्रिका – १
# व्याकरण आणि भाषाभ्यासावर आधारित

**वेळ : २५ मिनिटे** **एकूण गुण – १५**

१. खालील शब्दागटातील निश्चितपणे अनेकवचनी असणारा शब्द ओळखा. **(१ गुण)**

(१) रंग (२) कान (३) डोळे (४) थेंब

२. खालील वाक्यासाठी योग्य क्रियापद पर्यायांतून निवडा. **(१ गुण)**

**मला धावण्याच्या स्पर्धेत प्रथम क्रमांक..........**

(१) मिळवला (२) मिळवू (३) मिळवतो (४) मिळाला

३. दिलेल्या नामांपैकी नपुंसकलिंगी नामे दर्शवणारा पर्याय लिहा. **(१ गुण)**

अ) गावे ब) नौका क) झाड

(१) फक्त अ बरोबर (२) फक्त अ आणि क बरोबर

(३) फक्त क बरोबर (४) फक्त ब बरोबर

४. खालील वाक्यातील क्रियापदाचे योग्य भूतकाळी रूप कोणते? **(१ गुण)**

**शर्यत जिंकण्याचे माझे स्वप्न पूर्ण होईल.**

(१) झाले (२) झाले असेल (३) होते (४) होऊ दे

५. चुकीचे विरामचिन्ह घातलेले वाक्य पुढीलपैकी कोणते आहे. **(१ गुण)**

(१) तू कुठे जातोस? (२) मी शाळेत जातो.

(३) किती हा पाऊस! (४) ताई म्हणाली : घरी जा?

६. खालील वाक्यातील अशुद्‌ध शब्दांची संख्या किती आहे. **(१ गुण)**

**या सारया पाउलखुणा रांगोळी घातल्यासारख्या सुदंर दिसतात.**

(१) पाच (२) तीन (३) चार (४) दोन

७. चौकटीत अक्षरे जुळवून तयार होणाऱ्या म्हणीचा योग्य अर्थ पर्यायांतून निवडा. **(१ गुण)**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| खे | त | सा | गा | ळ |
| | ळ | का | ला | सा |
| | | वा | क | व |

(१) कनिष्ठ व्यक्तीने वरचढ होणे. (२) मूळ स्वभाव बदलत नाही.

(३) मुले आईवडिलांप्रमाणे असतात. (४) जवळची वस्तू शोधण्यासाठी दूर जाणे.

८. अधोरेखित शब्दाचे सर्वाधिक योग्य रूप पर्यायांतून निवडा. **(१ गुण)**

माझ्या <u>घर</u> मैदान आहे.


(१) घराने (२) घरासमोर (३) घराच्या (४) घरातील

९. पुढील पर्यायांतील चुकीची जोडी ओळखा. **(१ गुण)**

(१) पेन – लेखणी (२) स्क्रीन – पडदा (३) प्लीज – कृपया (४) व्हिजन – पृथ्वी

Sample Content

१०. खालील चौकटींत कोणती अक्षरे घेतल्यास चारही अर्थपूर्ण शब्द तयार होतील ? (१ गुण)




① मा, स, का, प ② आ, स, का, नि ③ धा, मा, का, नि ④ सा, रा, चा, का

११. रामरावांना स्वत:ची सहीदेखील येत नाही; कारण ते ............ आहेत. (१ गुण)
रिकाम्या जागी योग्य आलंकारिक शब्द पर्यायांतून निवडा.

① घरकोंबडा ② बोकेसंन्यासी ③ अंगठाबहाद्दर ④ नंदीबैल

१२. प्राणी व त्यांचा निवारा यांची योग्य जोडी असलेला पर्याय निवडा. (१ गुण)

① वाघ – गोठा ② गाय – तबेला ③ सिंह – गुहा ④ उंदीर – वारूळ

१३. 'देव आहे असे मानणारा' या शब्दसमूहासाठी योग्य शब्द या पर्यायातील अक्षरसमूहाने तयार होईल ? (१ गुण)

① क, स्ति, ना ② स्ति, स्व, क ③ आ, क, स्ति ④ वा, स्ति, क

१४. अधोरेखित शब्दाचा योग्य अर्थ पर्यायांतून निवडा. (१ गुण)
महाराजांनी त्याला <u>वर</u> दिला – 'तुझे कल्याण होवो.'

① श्रेष्ठ ② पती ③ आशीर्वाद ④ दिशा

१५. चौकटीत दिलेल्या अक्षरांपासून तयार होणाऱ्या म्हणीतील शेवटच्या दोन अक्षरांपासून बनणाऱ्या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द कोणता ? (१ गुण)

| | | | |
|---|---|---|---|
| पे | ती | ज | ╳ |
| | मो | क्षा | का |
| | | ना | ड |

① घाल ② बोलका ③ हलका ④ वजनदार

Sample Content

# सराव प्रश्नपत्रिका – २
# व्याकरण आणि भाषाभ्यासावर आधारित

**वेळ : २५ मिनिटे** **एकूण गुण – १५**

१. 'कष्टाळू' या शब्दाचा पर्यायी शब्द पुढीलपैकी कोणता ? **(१ गुण)**

(१) मेहनत (२) परिश्रम (३) मेहनती (४) मेहनताना

२. 'आनंद' या शब्दाचा समानार्थी शब्द पुढीलपैकी कोणता नाही ? **(१ गुण)**

(१) हर्ष (२) आमोद (३) मोद (४) क्रोध

३. पुढीलपैकी जोडशब्द ओळखा. **(१ गुण)**

(१) किमयागार (२) दुकानदार (३) गोरगरीब (४) कामगार

४. 'तीर' या शब्दाचा एक अर्थ बाण असा होतो. दुसरा अर्थ पुढीलपैकी कोणता ? **(१ गुण)**

(१) धनुष्य (२) नदी (३) काठ (४) पर

५. जसा सिंहाचा – छावा तसा : वाघाचा – **(१ गुण)**

(१) बछडा (२) कोकरू (३) पाडस (४) वासरू

६. पुढील वाक्यातील विशेषण कोणते ? **(१ गुण)**
आज मुलांनी रंगीत कपडे घातले होते.

(१) आज (२) मुलांनी (३) रंगीत (४) कपडे

७. पुढील वाक्याचा काळ ओळखा. **(१ गुण)**
डाव्या खुरांचा ठसा मोठा असतो.

(१) वर्तमानकाळ (२) भूतकाळ (३) भविष्यकाळ (४) साधाकाळ

८. पुढील ओळीतील सर्वनाम ओळखा. **(१ गुण)**
आपल्याला सगळ्या मुंग्या सारख्याच दिसतात.

(१) आपल्याला (२) सगळ्या (३) मुंग्या (४) सारख्याच

९. मोराच्या आवाजाला काय म्हणतात ? **(१ गुण)**

(१) चित्कार (२) फुत्कार (३) केकारव (४) चिवचिव

१०. खाली दिलेल्या वाक्यातील काळ ओळखा. **(१ गुण)**
'खेळणी तयार करायला बुरडाघरच्या कांबट्या आणाव्या लागायच्या'.

(१) वर्तमानकाळ (२) साधाकाळ (३) भविष्यकाळ (४) भूतकाळ

११. पुढीलपैकी एकवचन – अनेकवचनाची अयोग्य जोडी कोणती ? **(१ गुण)**

(१) किनार – किनारी (२) चादर – चादरी (३) वानर – वानरी (४) झालर – झालरी

१२. खालील वाक्य अर्थपूर्ण होण्यासाठी योग्य पर्याय निवडा. **(१ गुण)**
आपली चूक पकडली जाईल या भीतीने मीनाची .........

(१) बोबडी वळली (२) पोटात बाकबूक झाले (३) पाय लटलट कापले (४) तोंड पांढरे पडले

Sample Content

१३. खाली दिलेल्या अर्थाची योग्य म्हण पर्यायांतून निवडा. (१ गुण)
'क्षुद्र माणसे क्षुद्र वस्तूंना भाळतात'.

(१) गाढवाला गुळाची चव काय ?
(२) अडला हरी गाढवाचे पाय धरी
(३) कोल्ह्याला द्राक्षे आंबट
(४) कोल्हा काकडीला राजी

१४. 'लोखंडी वस्तू बनवणारा' यासाठी योग्य पर्याय निवडा. (१ गुण)

(१) कुंभार (२) लोहार (३) चांभार (४) सुतार

१५. खालील शब्दसमूहाबद्‌ल एक शब्द पर्यायांतून निवडा. (१ गुण)
केलेले उपकार न विसरणारा

(१) कृतघ्न (२) आस्तिक (३) नास्तिक (४) कृतज्ञ

Sample Content

# उत्तरे

## १. शब्दांच्या जाती

• **नाम**

१. i. शब्बीर
ii. पाऊस
iii. शाळा, सुरवाडेगुरुजी
iv. पाकीट, पैसे
v. मुले, बाग, फुलेफळे
vi. कविता, राऊत, हरसूलपाडा, आनंद.

२. i. **सचिन** उत्तम **खेळाडू** आहे.
ii. **अजयला** आंबा खूप आवडतो.
iii. **शिवाजी महाराजांचे शौर्य जगाने** पाहिले.
iv. **मुलांनी झाडावरील कैऱ्या** तोडल्या.
v. **हवेत गारवा** जाणवत होता.

३. **व्यक्ती :** अजय, विजय, गणेश, सावित्री, लक्ष्मी, राहुल, शरद, लता, आशा.
**प्राणी :** गाय, बैल, उंट, घोडा, हत्ती, कुत्रा, मांजर, सिंह, वाघ, गाढव.
**पक्षी :** पोपट, मैना, बगळा, गरुड, चिमणी, कावळा, कबुतर, घुबड, मोर, बदक.
**कीटक :** डास, झुरळ, माशी, मधमाशी, फुलपाखरू, रातकिडा, नाकतोडा, ढेकूण, वाळवी, भुंगा.
**वस्तू :** चेंडू, घड्याळ, टेबल, पुस्तक, वही, कपाट, चमचा, फळा, चप्पल, काठी.
**पदार्थ :** चटणी, वडा, चपाती, खीर, हलवा, बर्फी, शिरा, उपमा, इडली, डोसा.
**फळे :** आंबा, पेरू, चिकू, केळी, संत्रे, अननस, कलिंगड, द्राक्ष, फणस, अंजीर.
**फुले :** चंपा, चमेली, मोगरा, चाफा, गुलाब, कमळ, अबोली, जास्वंद, सूर्यफूल, झेंडू.
**गावे :** सायगाव, पनवेल, पेण, इंदापूर, रोहा, मुरुड, पालघर, रामपूर, उदयपूर, ठाणे.
**नद्या :** गंगा, सिंधु, सरस्वती, यमुना, गोदावरी, नर्मदा, कावेरी, सावित्री, जगबुडी, कोयना.
**गुण :** नम्रता, शूरता, साधेपणा, चांगुलपणा, गोडवा, गारवा, धिटाई, हुशारी, वेगळेपणा, कमीपणा.

४. i. बंडू, इजार, बोटे
ii. आई, इजार, कोनाडा.
iii. माणसे, मुंग्या
iv. कविता, भारत, धावपटू

५. i. **माधुरी** माधवला म्हणाली.
ii. आंब्याच्या झाडावर **कैऱ्या** लटकत होत्या.
iii. घसरगुंडी खेळायला आम्ही **बागेत** गेलो.
iv. **मराठी** विषय मला खूप आवडतो.
v. राष्ट्रपतींचे भाषण ऐकून **अजय** मंत्रमुग्ध झाला.
vi. महागाई वाढल्याने **भाज्या** महागल्या.

६. i. कविता हळवी आहे.
ii. वाघाचा पंजा चौकोनी असतो.
iii. तो खेळ आम्ही मधल्या सुट्टीत खेळत असतो.
iv. नुसतं कोरडं आभाळ पसरलं होतं.
v. मुले प्रार्थना म्हणत होती.
vi. आपल्या लोकांची बोरगावला पालं हायती.
vii. महाराज मी वादक नाही.
viii. अख्ख्या सातपुड्यात ढोलांवर थाप पडू लागते.

७. घर, झाड, मुले, चाक, मांजर, दरवाजा, खिडकी, कौल, अँटेना, मुलगी, मुलगा, पायरी, अंगण इत्यादी.

८. i. वरीलपैकी सर्व ii. राजस्थान

• **सर्वनाम**

१. i. त्याचा – सुभाषसाठी
ii. तो – सुभाषसाठी
iii. तुला – समीरसाठी
iv. तू – समीरसाठी
v. मला – सुभाषसाठी
vi. तो – सुभाषसाठी
vii. त्याच्या – सुभाषसाठी
viii. त्याने – समीरसाठी

२. i. हसीना खूप हुशार आहे. **ती** रोज शाळेत जाते.
ii. पक्षी उडत-उडत लांब गेले. **ते** दिसेनासे झाले.
iii. बाई मुलांना खाऊ वाटत होत्या. **त्या** मुलांशी गप्पा मारत होत्या.
iv. भाऊ घरात गेला. **त्याला** काही सुचेना.

३. i. ते बाजारात गेले.
ii. तुला त्यांनी हाका मारल्या.
iii. आम्ही जेवत होतो.
iv. त्याचा आवाज गोड आहे.
v. मी स्वत: झाडून घेतले.
vi. आपण प्रकल्प पूर्ण करूया.

४. i. नीता : आज आपण झोका खेळूया.
ii. मंदार : दादा, तू पण चल ना!
iii. दादा : मी नाही येणार. मुग्धाला ने.

Sample Content

Page no. **82** to **93** are purposely left blank.

To see complete chapter buy **Target Notes** or **Target E-Notes**

Sample Content

v. ग्रह (सूर्यमालेतील गोल) गृह (घर)
vi. उपहार (भेट) उपाहार (फराळ)
vii. दिन (दिवस) दीन (गरीब)
viii. लक्ष (लाख) लक्ष्य (साध्य)
ix. किल्ला (गड) किल्ली (चावी)
x. सुर (देव) सूर (स्वर)
xi. धड (शरीर) धडा (पाठ)
xii. राग (चिड) रोग (आजार)

- **शब्दसमूहाबद्दल एक शब्द**

१. i. अंगाई ii. कट्टा
iii. दिनक्रम iv. पाऊलवाट/पायवाट
v. पाणवठा vi. कशिदा
vii. स्वदेशी viii. कुंभारवाडा
ix. गोफण x. परडी

२. i. बुरुड ii. आदिवासी

- **गटात न बसणारा शब्द**

१. i. मुलगा – हे नाम असून बाकी सर्व क्रियापदे आहेत.
ii. मुलीला – हे नाम असून बाकी सर्व सर्वनामे आहेत.
iii. फूल – हे नाम असून बाकी सर्व विशेषणे आहेत.
iv. जिल्हा – हे सामान्यनाम असून बाकी सर्व विशेषनामे आहेत.
v. दिवसरात्र – या जोडशब्दात दोन विरुद्धार्थी शब्द एकत्र आले असून बाकी सर्व जोडशब्दांत दोन समानार्थी शब्द एकत्र आले आहेत.
vi. गोड – हे गुणवाचक विशेषण असून बाकी सर्व भाववाचक नामे आहेत.
vii. झाड – झाड हे एकवचनी असून बाकी सर्व शब्द अनेकवचनी आहेत.
viii. वाडा – हा शब्द पुल्लिंगी असून बाकी शब्द स्त्रीलिंगी आहेत.
ix. खेळते – हे क्रियापद वर्तमानकाळ दर्शवते, तर बाकी सर्व क्रियापदे भूतकाळ दर्शवतात.
x. आला – हे क्रियापद भूतकाळ दर्शवते, तर बाकी सर्व क्रियापदे भविष्यकाळातील आहेत.
xi. दुकानदार – या शब्दाला प्रत्यय लागलेला आहे, तर बाकी सर्व शब्दांना उपसर्ग लागलेले आहेत.

## सराव प्रश्नपत्रिका - १

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | १ २ ● ४ | २. | १ २ ३ ● | ३. | १ २ ● ४ | ४. | ● २ ३ ४ |
| ५. | १ २ ३ ● | ६. | १ ● ३ ४ | ७. | १ २ ३ ● | ८. | १ ● ३ ४ |
| ९. | १ २ ३ ● | १०. | १ ● ३ ४ | ११. | १ २ ● ४ | १२. | १ २ ● ४ |
| १३. | १ २ ● ४ | १४. | १ २ ● ४ | १५. | १ २ ● ४ | | |

## सराव प्रश्नपत्रिका - २

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | १ २ ● ४ | २. | १ २ ३ ● | ३. | १ २ ● ४ | ४. | १ २ ● ४ |
| ५. | ● २ ३ ४ | ६. | १ २ ● ४ | ७. | ● २ ३ ४ | ८. | ● २ ३ ४ |
| ९. | १ २ ● ४ | १०. | १ २ ३ ● | ११. | १ २ ● ४ | १२. | ● २ ३ ४ |
| १३. | १ २ ३ ● | १४. | १ ● ३ ४ | १५. | १ २ ३ ● | | |

Sample Content

# लेखन विभाग

## १ निबंधलेखन

निबंधलेखन करताना दिलेला विषय समजून घेणे आवश्यक असते. एखादा प्रसंग, व्यक्ती किंवा ठिकाण यांबद्दलचा निबंध लिहिताना आपल्याला त्याविषयीचे ज्ञान असणे आवश्यक असते. आत्मकथनात्मक निबंध लिहिताना आपणच तो बोलणारा घटक आहोत असे मानून आपला आनंद, खंत, सल्ला, इच्छा व्यक्त करणे अपेक्षित असते. वैचारिक निबंध लिहिताना दिलेल्या विषयाची चांगली बाजू व वाईट बाजू यांचा विचार करून व त्यावरून आपले मत मांडत आपण मुद्देसूदपणे लेखन केले, तर आपला निबंध अधिक परिणामकारक होतो. सोपे शब्द, छोट्या वाक्यांचा उपयोग, सुविचार, म्हणी यांचा वापर आणि परिच्छेदांमध्ये केलेले लेखन यांमुळे आपला निबंध आकर्षक ठरतो. निबंधलेखन करताना सुवाच्य अक्षरात, खाडाखोड न करता टापटीपपणे लेखन करण्याचा प्रयत्न करा.

**नमुना प्रश्न**

**१. खालील विषयांवर निबंध लिहा.**

### प्रसंगलेखन

*१. **मी पाहिलेला अपघात**

उत्तर :

**मी पाहिलेला अपघात**

पावसाळ्याचे दिवस होते. रिमझिम पाऊस पडून गेला होता. आमची शाळा सुटली आणि आम्ही शाळेच्या फाटकाबाहेर पडलो. एवढ्यात एक मोटरसायकल वेगाने आमच्या समोरून गेली आणि पुढे जोरदार आवाज झाला. गाड्यांच्या ब्रेकचा आवाज आणि एकमेकांवर गाड्या धडकल्याचा आवाज आला. पुढच्या वळणावर त्या मोटरसायकलवाल्याचा अपघात झाला होता.

वेगाने जाणारा मोटरसायकल स्वार नुकत्याच पडलेल्या पावसामुळे निसरड्या झालेल्या रस्त्यावरून घसरला होता. त्याला वाचवण्याच्या प्रयत्नात मागच्या गाड्यांनी एकदम ब्रेक मारल्यामुळे त्या गाड्या एकमेकींवर आदळल्या होत्या. त्यांचे खूपच नुकसान झालेले दिसत होते. मोटरसायकलवाल्याची अवस्था खूप वाईट दिसत होती. त्याच्या हातापायांना मार लागलेला दिसत होता; मात्र हेल्मेटमुळे त्याला मोठी दुखापत झालेली नव्हती. वेदनेने तो विव्हळत असताना काही लोक त्याच्या मदतीला धावले, त्यांनी त्याला उचलून रस्त्याच्या बाजूला बसवले. त्याची मोटरसायकल एकाने उचलून उभी केली. एवढ्यात वाहतूक पोलीस आले. त्यांनी रस्ता मोकळा करून अपघाताचा पंचनामा सुरू केला. जमलेली गर्दी हटवली. जखमी मोटरसायकलस्वार धक्क्यातून थोडा सावरला होता. एका गाडीवाल्याने त्याला हॉस्पिटलमध्ये भरती केले.

आजही माझ्या कानात या अपघाताचा कर्कश आवाज घुमतो आणि भीतीने अंगावर शहारे येतात.

*२. **मी गर्दीत हरवतो**

उत्तर :

**मी गर्दीत हरवतो**

मे महिन्यात आमच्या गावात जत्रा भरते. शाळेला सुट्टी असल्यामुळे मी दरवर्षी आईबाबांबरोबर गावच्या जत्रेला जातो. गेल्यावर्षीच्या जत्रेत मात्र माझी  मोठी फजिती झाली. आईला सांगून मी माझ्या मित्रांबरोबर जत्रेला गेलो. गावची जत्रा म्हणजे मोठा आनंदाचा उत्सव असतो. आसपासच्या गावातील खूप लोक या जत्रेला येतात. वेगवेगळ्या प्रकारची दुकाने, खेळ, खाऊची दुकाने जत्रेत मांडलेली असतात.

मी मोठ्या उत्साहाने या जत्रेला मित्रांबरोबर आलो आणि जत्रेत फिरता फिरता आमची चुकामूक झाली. माणसांच्या एवढ्या गर्दीत मला काहीच समजत नव्हते. मी रस्ता काढत आजूबाजूला मित्रांना शोधण्याचा प्रयत्न केला; पण कोणीही दिसत नव्हते. हळूहळू माझा धीर खचू लागला. सगळीकडे माणसांची गर्दी; मात्र माझ्या ओळखीचे कोणीही नव्हते. मी अक्षरशः रडवेला झालो होतो. एवढ्यात मला मंदिराचा कळस आणि झेंडा दिसला. मी त्या दिशेने चालू लागलो. मंदिराजवळ पोहोचलो. घरी जाण्याचा रस्ता माहीत

Sample Content

नव्हता. मित्र कुठेही दिसत नव्हते. मंदिराच्या परिसरात फिरताना शेजारचे काका दिसले. धावतच त्यांच्यापर्यंत पोहोचलो आणि त्यांना घरी सोडण्याची विनंती केली. त्यांनी आपल्या सायकलवरून मला घरी सोडले.

घरी पोहोचल्यानंतर मला हायसे वाटले. घरच्यांनी मात्र माझी खूप थट्टा उडवली. आजही हा प्रसंग आठवला, की अंगावर काटा येतो.

***३. होळीचा सण**

**उत्तर :**

**होळीचा सण**

कोकणात इतर सणांप्रमाणे होळीचा सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. यावर्षी होळीच्या सणासाठी मी माझ्या आजोळी गेलो होतो. गावची होळी पाहण्याचा आणि अनुभवण्याचा हा माझा पहिलाच प्रसंग होता. होळीच्या दिवशी अगदी सकाळपासूनच सारे गाव जय्यत तयारीला लागले.

पहाटेपासूनच ग्रामदेवतेची पालखी गावात फिरत होती. याबरोबरच इतर खेळी किंवा सोंगे घरोघरी फिरत होती. संकासुर हा एक त्यातला प्रकार आहे. काळ्या रंगाचे कपडे, शंकूच्या आकाराची टोपी, लांब लांब सफेद दाढी-मिशा असे या संकासुराचे रूप घाबरवणारे होते. कमरेला बांधलेल्या घुंगरांचा आवाज करत तो घरोघरी नाचत होता आणि काही मुले त्याला चिडवण्यासाठी त्याचे घुंगरू ओढून धावत होते. त्यांना पकडण्यासाठी संकासूर त्यांच्या मागे हातात चाबूक घेऊन धावत जात होता. हा सारा खेळ खूपच मनोरंजक होता.

पालखी नाचवण्याचा प्रकारही खूप सुंदर होता. दोघेजण पालखी खांद्यावर घेऊन ढोल आणि सनईच्या तालावर वर्तुळाकार नाचताना पाहणे खूपच आनंददायी होते. गावातील होळीचा आणखी एक कार्यक्रम म्हणजे गावाच्या आजूबाजूची सुकलेली झाडे गोळा करून आणणे व होळी रचणे. यातदेखील आम्ही मुलांनी खूप मजा केली. रात्री रचलेल्या होळीचे पूजन केले गेले. गावातील सर्वमंडळी पूजन सुरू असताना होळीभोवती नारळ घेऊन प्रदक्षिणा मारत होते. पूजा पूर्ण होताच मानकऱ्यांच्या हस्ते होळी प्रज्वलित केली गेली. मी माझ्या हातातील नारळ होळीमध्ये अर्पण केला. वेगवेगळ्या प्रकारचे नृत्य यावेळी सादर केले गेले. मी पाहिलेला हा होळीचा सण खरोखरच अविस्मरणीय होता.

***४. आमचा क्रीडामहोत्सव**

**उत्तर :**

**आमचा क्रीडामहोत्सव**

आमच्या शाळेत यावर्षी साजरा झालेला क्रीडामहोत्सव खरोखरच अविस्मरणीय असा होता. शाळेच्या क्रीडांगणावर सारे विद्यार्थी आपापल्या संघाचे रंगीत कपडे घालून रांगेत उभे होते. बँड पथकाच्या विद्यार्थ्यांनी सुंदर संगीताच्या साथीने आलेल्या मान्यवरांचे स्वागत केले. शाळेच्या मैदानावर जणू इंद्रधनुष्य अवतरले होते. मान्यवरांनी आणि प्रमुख पाहुण्यांनी दीपप्रज्वलन करून क्रीडामहोत्सवाचा शुभारंभ केला.

मी धावण्याच्या स्पर्धेत सहभागी झालो होतो. वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या स्पर्धा सुरू होत्या. पालक टाळ्या वाजवून विद्यार्थीवर्गाला प्रोत्साहन देत होते. धावण्याच्या स्पर्धेत मी दुसऱ्या क्रमांकावर आलो. महोत्सवाच्या शेवटी आपल्याला बक्षीस मिळणार या विचारानेच मला अभिमान वाटत होता. मैदानी खेळांमध्ये कबड्डीचा सामना खूपच रंगतदार झाला. इयत्ता नववी व दहावीच्या खेळाडूंना कबड्डी खेळताना पाहून आमच्यातही जोश निर्माण झाला होता. आम्ही जोरजोराने ओरडून टाळ्या वाजवून आमच्या संघाला प्रोत्साहन देत होतो. उंच उडी, लांब उडी, थाळी फेक हे सारे क्रीडाप्रकार पाहून पुढील वर्षी आपणही यामध्ये सहभागी व्हायचे मी मनोमन ठरवून टाकले. क्रीडामहोत्सवाच्या समाप्तीपूर्वी मानवी मनोरे व कवायत यांची स्पर्धा घेण्यात आली. त्यामध्ये संगीताच्या साथीने सर्वच संघांनी उत्तम प्रात्यक्षिके सादर केली.

सर्व स्पर्धा संपल्यानंतर अल्पोपाहार आणि बक्षीस वितरण सोहळा पार पडला. साऱ्या स्पर्धकांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. क्रीडामहोत्सवाचा दिवस म्हणजे फक्त खेळ आणि खेळ! पुढच्या वर्षीचा क्रीडामहोत्सव येण्याची वाट बघणे आमच्या हातात होते; मात्र झालेला क्रीडामहोत्सव खूप आनंददायी आठवणी देऊन गेला.

***५. मी पाहिलेले प्रदर्शन**

**उत्तर :**

**मी पाहिलेले प्रदर्शन**

आमच्या सोसायटीमध्ये या वर्षी २७ फेब्रुवारीला मराठी भाषा दिनानिमित्त पुस्तक प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. लहान थोरांना मराठी भाषेतील उत्तम साहित्य माहित व्हावं हा यामागील मूळ हेतू होता. सोसायटीच्या आवारात विविध प्रकारच्या पुस्तकांचे स्टॉल लावण्यात आले होते. विविध लेखक, लेखिका, कवी, कवयित्री यांची पुस्तके विक्री व प्रदर्शनासाठी मांडण्यात

Sample Content

## AVAILABLE BOOKS FOR STD. V:
(ENG., MAR. & SEMI ENG. MED.)

### NOTES
- English Balbharati
- मराठी सुलभभारती
- हिंदी सुलभभारती
- Environmental Studies (Part ONE & TWO)
- Mathematics

### WORKBOOK
- English Balbharati
- मराठी सुलभभारती
- हिंदी सुलभभारती
- Environmental Studies (Part ONE)
- Environmental Studies (Part TWO)
- Mathematics

## AVAILABLE BOOKS FOR STD. VI:
(ENG., MAR. & SEMI ENG. MED.)

### NOTES
- English Balbharati
- मराठी सुलभभारती
- हिंदी सुलभभारती
- History-Civics
- Geography
- General Science
- Mathematics

### WORKBOOK
- English Balbharati
- मराठी सुलभभारती
- हिंदी सुलभभारती
- History-Civics
- Geography
- General Science
- Mathematics

### ADDITIONAL TITLES
- English Grammar & Writing Skills Book
- Hindi Grammar & Writing Skills Book
- Marathi Grammar & Writing Skills Book




Scan the QR code to buy e-book version of Target's Notes on Quill - The Padhai App

### OUR PRODUCT RANGE
Children Books | School Section | Junior College
Degree College | Entrance Exams | Stationery



Explore our range of STATIONERY


Marketed by:

Target Publications® Pvt. Ltd.
Transforming lives through learning.



**Address:**
B2, 9th Floor, Ashar, Road No. 16/Z,
Wagle Industrial Estate, Thane (W)- 400604

**Tel:** 88799 39712 / 13 / 14 / 15
**Website:** www.targetpublications.org
**Email:** mail@targetpublications.org


Visit Our Website